# महाराष्ट्र न्यायिक अकादमी आणि भारतीय मध्यस्थी केंद्र व प्रशिक्षण संस्था

उत्तन–गोराई रोड, उत्तन, भाईंदर (प.), जि. ठाणे – 401 106.

**अतुल एम. कुऱ्हेकर**
**सहसंचालक**

कार्यालयीन दुरध्वनी क्र. : 8433990101
ई–मेल : mjauttsc@indianjudiciary.gov.in


जा.क्र.मन्याअ/उत्तन/ 1367 /२०२५ दिनांक : १२/०९/२०२५

## दरपत्रक निवेदन

मंजूर 'कार्यकारणी ठरावानुसार' अकादमीच्या मुख्य इमारतीमधील उपहारगृह, प्रेक्षागृह लॉबी आणि व्ही.आय.पी. लॉबी येथील भिंतींना रंगरंगोटी करणे आहे. इच्छुक कंत्राटदार/पुरवठादार/दुकानदार यांनी प्रत्यक्ष अकादमीमध्ये येउन कामाची पाहणी करून आवश्यक असणारे रंग, मजुरी व रंगकाम करण्याकरीता लागणारे इतर साहित्य याबाबतचे दरपत्रक बंद पाकीटातून अकादमीच्या कार्यालयामध्ये दि. १९.०९.२०२५ रोजी संध्याकाळी ०४.३० पर्यंत सादर करावे

अटी व शर्ती :—

१. संबंधीत कंत्राटदार यांनी स्वत:च्या लेटरपॅडवर दरपत्रक सादर करावे. दरपत्रकावर ''मुख्य इमारतीमधील उपहारगृह, प्रेक्षागृह आणि व्ही.आय.पी. लॉबीच्या रंगाचे व मजुरीचे दरपत्रक'' असे नमूद करावे. सदरचे दरपत्रक 'महाराष्ट्र न्यायिक अकादमी, उत्तन–गोराई रोड, उत्तन, भाईंदर पश्चिम –४०११०६' या पत्त्यावर पोस्टाने किंवा प्रत्यक्षात येउन कार्यालयामध्ये दि. १९.०९.२०२५ रोजी पर्यंत सादर करावे. त्यानंतर आलेले दरपत्रक कोणत्याही कारणास्तव विचारात घेतले जाणार नाही.

२. दरपत्रकामध्ये वस्तू व सेवा कर समाविष्ट आहे किंवा नाही याचा स्पष्ट उल्लेख करावा.

३. दरपत्रकांमध्ये येणे जाण्याचा खर्च तसेच सामान आणण्याचा खर्च आवश्यकता असल्यास स्पष्टपणे नमुद करावा.

४. दरपत्रक स्विकारणे किंवा नाकारण्याचा संपुर्ण अधिकार कार्यालयीन प्रमूखास राहिल.

५. दरपत्रक सादर करण्यापुर्वी नामांकित रंगाचे प्रकार व दर्जा नमुने अकादमीच्या कार्यकारी समितीच्या पंसतीसाठी व मंजुरीसाठी स्वखर्चाने आणावेत व परत घेवुन जावे.

६. कार्यकारी समितीने पसंत करून मंजुर केलेली रंग वापरणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. तसेच त्या रंगाचा पुरेसा साठा उपलब्ध करून घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

७. दरपत्रक प्राप्त झाल्यानंतर रंगाचे दर्जा, गुणवत्ता आणि संबंधित जागेला अनुरूप रंगाचे नमुने याला प्राधान्य देण्यात येईल.

८. दर नमुद करताना स्वत: मोजणी करून कामाचे साहित्य याचा स्पष्ट उल्लेख दरपत्रकात करावा.

९. जागेची पाहणी व मोजणी सकाळी ०९.३० ते दुपारी ०४.३० या दरम्यान करता येईल. (गुरूवार साप्ताहिक सुट्टीचा दिवस सोडून)

दिनांक : १२/०९/२०२५

atul kurhekar

**(अतुल एम. कुऱ्हेकर)**
**सहसंचालक**

महाराष्ट्र न्यायिक अकादमी व
भारतीय मध्यस्थी केंद्र आणि प्रशिक्षण संस्था